# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/01/2024 (शुक्रवार) सायंकाळ

---

## घरफोडी

१) पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावर मौजा वारेगाव येथे दिनांक ११/०१/२०२४ चे ०१.०० वा. ते ०१.१५ वा. सुमारास कोणीतरी अज्ञात चोराने रूमच्या भींतीला छिद्र करून रूम मध्ये बांधले असलेले १६ बकऱ्यापैकी तीन मोठे बकरे किंमती ६०००/— रु., सहा लहान बकरी किंमत १००००/—रु असे एकूण ९ लहान मोठे बकऱ्या एकूण किंमती १६०००/— रु. चा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— मुकेश श्रीराम जरिया, वय ३२ वर्ष, रा. दीनदयाल चौक मनमोहन नगर जबलपूर ह. मु. नंदू कांबळे यांचे शेतात वारेगाव तालुका कामठी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८०, भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी सहायक फौजदार चंदा नारनवरे यांनी भेट दिली आहे तसेच अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार चंदा नारनवरे या करीत आहे.

२) पो.स्टे. रामटेक :— अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावर मौजा शितकरण केंद्र मनसर येथे दिनांक ०३/०१/२०२४ चे २३.०० वा. ते दिनांक ०४/०१/२०२४ चे ०६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— निखीलेश हरिश समरीया वय ३६ वर्ष रा. हुडको कॉलनी नारा रोड जरिपटका हे शितकरण केंद्र मनसर येथे आले तेव्हा मुख्य दाराचे लॉक तुटलेले दिसले. केंद्राचे आतमध्ये प्रवेश करून पाहणी केली असता केंद्रातील १) एक जुनी मशीन किंमती २०,०००/—रू २) इतर स्क्रॅबचे कॅन किंमती ३०,०००/—रू असा एकुण ५०,०००/— रू. चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४६१, ३८०, भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस उपनिरीक्षक संजय खोब्रागडे यांनी भेट दिली आहे तसेच अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संजय खोब्रागडे, मो. नं. ९८९०२२२८४९ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. अरोली**:— अंतर्गत मौजा अरोली शिवार येथे दिनांक १०/०१/२०२४ चे १९.०० वा. ते दिनांक ११/०१/२०२४ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— सुरेश रामक्रिष्ण बावणकुळे, वय ४९ वर्ष रा. अरोली याने आपले शेतात ठेवलेले १२० धानाचे बोरेपैकी ५० बोरे धान (प्रति बोरा ८५ किलो) असा एकुण ४२ कीलो धान एकुण किंमती १,२५,०००/—रू मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. अरोली येथे अज्ञात आरोपींविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असुन सदर घटनास्थळी पोलीस हवालदार बगमारे यांनी भेट दिली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार बगमारे, मो. नं. ७०३०१०९९६४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. एमआयडीसी बोरी**:— अंतर्गत युनिटेक कंपनी वर्धा रोड येथे दिनांक ०९/०१/२०२४ चे सायं. ०५.३० वा. दरम्यान इंग्नोट झिंगचा सात टन माल बाहेरून कंपनीत आला होता. दि. १०/०१/२०२४ रोजी सुट्टी असल्याने ११/०१/२०२४ रोजी १०.०० वा. कंपनीत आल्यावर झिंक तपासणी केली असता सात टन झिंग पैकी १ बंडल इग्नोट झिग प्लेट चा बंडल त्यामध्ये ४० नग प्रंत्येक नगाचे वजन २५ किलो प्रमाणे एकुण हजार किलो माल किंमत अंदाजे २,०००००/— रू. माल दिसला नाही कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— नितिन पुरूषोत्तम वाकडे, वय ५६ वर्ष, प्रियदर्शना कॉलनी नागपुर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपींविरुध्द कलम ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक विनायक सातव हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**